# कमर जलालाबादी - भाग ३



ओ. पी. नय्यर यांचा हिंदी चित्रपटसृष्टीत प्रवेश झाला आणि त्यांनी काही प्रमाणात आनंदी आणि स्वच्छंदी गाणी देण्यास सुरुवात केली. त्यामुळे वातावरणात बदल होऊन ते थोडेफार सुखावले. कमर जलालाबादी यांनी त्यांना तशीच गाणी पुरवून, वातावरणात बदल घडविण्यास खूपच मदत केली.

कमर यांनी ओ. पी. नय्यर यांच्यासाठी लिहिलेली गीते पहा - ’देख के तेरी नजर बेकरार हो गये’ (’हावरा ब्रिज’/आशा आणि रफी), ’मेरा नाम चिन चिन चू’ (’हावरा ब्रिज’/गीता), ’आईये मेहेरबान’ (’हावरा ब्रिज’/आशा). ह्यांच्या चाली सुंदर होत्या, गायक अप्रतिम होते, पण त्यांचे शब्द कधीच विसरू नका. एखाद्या पार्टीत गाणाऱ्या गायकाला गाण्याचे शब्द आठवत नसतील तर काय होईल विचार करा. गायकाला ज्या गाण्याचे शब्द आठवत आहेत असेच एखादे गाणे तुम्हाला ऐकावेसे वाटेल. ’...कही बॅनर्जी, कही चॅटर्जी, कही घोष, कही दत्ता है, सुनो जी ये कलकत्ता है ! ईंट की दुक्की, पान का ईक्का...’ (’हावरा ब्रिज’/रफी), ’पिया, पिया, ना लागे मोरा जिया’ (’फागुन’/आशा), ’छ्न छ्न घुंगरू बोले’ (’फागुन’/आशा), ’मै सोया अखियाँ मीचे’ (’फागुन’/रफी आणि आशा), ’इक परदेसी मेरा दिल ले गया’ (’फागुन’/आशा आणि रफी), ’तुम रूठ के मत जाना’ (’फागुन’/रफी आणि आशा)

त्यानंतर कमर यांनी नय्यर यांना ’रागिणी’ची सुंदर, जोशपूर्ण गाणी लिहून दिली. किशोर आणि आशा

यांच्यासाठी 'मै बंगाली छोकरा, करू प्यार को नमस्कारम्', तर ह्याच संगीतकाराने आशासाठी तीन ताल बंदिशीत बांधलेले आणि पुढे अत्यंत लोकप्रिय झालेले एक अप्रतिम गीत 'छोटासा बालमा' याबद्दल काय सांगणार ? तसेच 'मुझको बार बार याद ना आना' हे प्यायलेला किशोर आणि आशा यांचे उचक्या देत म्हतलेले गाणे अवर्णनीयच !

कमर ओ. पी. नय्यरसोबत काम करतच होते. रफी अणि आशा यांचे 'दो उस्ताद' मधले 'रिक रिक टिक बूम बूम चिक', तर रफी, आशा व शमशाद यांनी विलक्षण संयत आवाजात म्हटलेले 'हमपे दिल आया तो बोलो क्या करोगे' हे गीत, तसेच 'कल्पना' चित्रपटातील रफी-मन्ना डे यांचे 'तूही मेरी प्रेमदेवता' ही सर्व गीते कमर यांचीच आहेत.

आता त्यांनी कल्याणजी-आनंदजी यांच्यासाठी लिहिलेली गीते पाहूया. 'छलिया' मध्ये सुंदर गाणी आहेत. त्यांतली काही - 'बाजे पायल छम छम' (लता व कोरस), 'तेरी राहोंमे खडे है दिल थाम के' (लता) आणि 'मेरे टूटे हुए दिलसे' (मुकेश). नंतर 'हिमालय की गोद मे' मध्ये, 'मै तो इक ख्वाब हूँ' (मुकेश). 'ये दिल किहको दूँ' मध्ये 'फिर आने लगा याद वही' (रफी आणि उषा खन्ना). 'उपकार' मध्ये 'दीवानोंसे ये मत पूँछो' (मुकेश). आणि 'सच्चा झूठा' मध्ये 'कह दो कह दो, हो तुम जो कह दो' (लता आणि किशोर).

कमर यांनी चित्रपटांसाठी लिहिलेल्या गीतांपैकी काही अप्रतिम, अविस्मरणीय अशी अवीट गोडीची गीते आपल्यापैकी काही रसिकांना वाचायची असतील किंवा संग्रही ठेवायची असतील तर त्या संदर्भातील एक पुस्तक आता बाजारात उपलब्ध आहे. कमर जलालाबादी यांची कन्या सुभाषिनी यांनी संकलन केलेले आणि एक संगीतप्रेमी व लोकरंजनासाठी चित्रपटगीतांचे कार्यक्रम करणारे श्री. कौशिक कोठारी यांच्या मदतीने आणि पाठिंब्याने 'अमर गीत कमर के' हे पुस्तक उपलब्ध आहे.

तर एकंदरीत अशी एकाहून एक सुरेल, मधुर आणि सरस गाणी आपल्या लेखणीतून लोकोत्तर प्रतिभेद्वारे रसिकांना सादर करणाऱ्या या निगर्वी गीतकाराला मानाचा मुजरा ! नावाच्या स्पेलिंगच्या सुरुवातीला त्यांनी प्रथमपासूनच 'आय्' दाखवला असता, तर याहीपेक्षा जास्त यश त्यांना मिळाले असते का ?

(समाप्त)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician’s role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book “Talat Mahmood, The Velvet Voice” was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com